# BSNL employee unions set Nov 20 deadline for revision of wages

TIMES NEWS NETWORK

**Chhatrapati Sambhajinagar:** BSNL employees and officers across the country will launch an indefinite strike if their long-pending wage revision is not implemented by Nov 20, the All Unions and Associations of BSNL (AUAB) warned on Monday.

The unions will first observe a symbolic one-day nationwide strike on Nov 20. If their demand remains unresolved, they will proceed with an indefinite strike, AUAB general secretary Mahadev Adsul said.

Adsul was speaking at a statewide conference of major BSNL unions and associations in Chhatrapati Sambhajinagar. He said BSNL employees continue to work on pay scales that are nearly 20 years old. Annual increments of thousands of employees have also stopped.

"The recommendations for officers' wage revision were forwarded nearly 10 years ago. For employees, the wage agreement was signed between unions and management in Oct 2025 and sent to the Department of Telecommunications for approval. However, DoT has been delaying the decision, leading to widespread resentment," Adsul said.

AUAB said the present agreement expires in Dec, making an early decision necessary.

State president Ranjan Dani said employees should not be denied a revision because of BSNL's financial position. "It is unfair to withhold revision citing BSNL's losses. BSNL is not working only for profit, but is rendering national service by bridging the digital divide and installing towers even in remote villages with only 10-20 households," he said.

TOI



Mahadev Adsul, general secretary of the All Unions and Associations of BSNL, addresses a state-level conference in Sambhajinagar

Adsul said employees could not be blamed for service-related problems affecting the company's revenue. "Despite adverse conditions, staff helped increase revenue from Rs 18,000 crore to Rs 20,000 crore, but their contribution is overlooked," he said.

Unions under the AUAB banner have already launched a nationwide agitation. It includes demonstrations, hunger strikes and social media campaigns.

"Representations will be submitted to MPs, ministers and governors, followed by a nationwide agitation and a symbolic one-day strike on Nov 20. If the demand is not met, an indefinite strike will be launched," Adsul said.

# 'बीएसएनएल' कर्मचाऱ्यांचा संपाचा इशारा

लोकसत्ता **विशेष** प्रतिनिधी

**नवी दिल्ली :** भारत संचार निगम लिमिटेडच्या (बीएसएनएल) कर्मचाऱ्यांची १ जानेवारी २०१७पासून प्रलंबित असलेली वेतन सुधारणा लागू करण्याच्या मागणीने जोर धरला आहे. वेतनवाढीसाठी केंद्र सरकारने आर्थिक क्षमतेची अट शिथिल करावी, या मागणीसाठी कर्मचारी संघटनांनी आंदोलन तीव्र केले असून, मागण्या मान्य न झाल्यास २० नोव्हेंबरला देशव्यापी संप करण्याचा इशारा दिला आहे.

'बीएसएनएल'मधील कर्मचारी विविध संघटनांचा महासंघ असलेल्या 'ऑल युनियन्स अँड असोसिएशन्स ऑफ बीएसएनएल'ने (एयूएबी) वेतन सुधारणा, वेतन करार आणि निवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शनविषयक प्रश्नांवर तोडगा काढण्याची मागणी केली आहे. त्यासाठी सप्टेंबरपासून देशभरात आंदोलन सुरू आहेत.

केंद्र सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांसाठीच्या वेतन धोरणातील आर्थिक क्षमतेची अट हा वेतन सुधारणा रखडण्यामागील प्रमुख अडथळा आहे. कंपनीची आर्थिक स्थिती आणि वेतनवाढीचा अतिरिक्त आर्थिक भार लक्षात घेऊनच सुधारणा लागू करण्याची तरतूद आहे. 'बीएसएनएल'संबंधित आर्थिक निकष पूर्ण करत नसल्याने वेतनवाढ लागू करता येत नसल्याची भूमिका वेळोवेळी केंद्र सरकारने घेतली होती.



खासगी कंपन्यांनी लिलावात स्पेक्ट्रम दिले गेले, त्यांनी सर्कल्स आपापसांत वाटून घेतले. 'बीएसएनएल'ला मात्र देशभरातील स्पेक्ट्रमसाठी ७० हजार कोटी भरावे लागले, तेही दिल्ली-मुंबई सोडून. आताही '५जी' स्पेक्ट्रम दिला, पण आमच्याकडे त्याची उपकरणे नाहीत, अशा अनेक बाबींमुळे 'बीएसएनएल'चे आर्थिक नुकसान होते. त्याला 'बीएसएनएल' जबाबदार नाही. तरीही आर्थिक क्षमतेचे कारण दाखवून आमची पगारवाढ रोखली गेली आहे.

**– महादेव अडसूळ,**
सरचिटणीस, 'एयूएबी'

**Times of India**

TIMES OF INDIA

# ‘बीएसएनएल’च्या कर्मचाऱ्यांनी एक व्हावे

## कर्मचारी नेते अडसूळ यांचे आवाहन

म. टा. प्रतिनिधी, छत्रपती संभाजीनगर

बीएसएनएल कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना वीस वर्षांपूर्वीच्या वेतनावर काम करण्यास भाग पाडले जात आहे ही बाब अन्यायकारक आणि संतापजनक आहे. हजारो कर्मचाऱ्यांची वार्षिक वेतनवाढ सुद्धा बंद झाली आहे. व्यवस्थापनाने वेतन करारावर सह्या करून प्रस्ताव मंजुरीसाठी सरकारकडे पाठवला असून सुद्धा दूरसंचार विभाग याबाबत दिरंगाई करत आहे, असा आरोप एसएनईए संघटनेचे महासचिव महादेव अडसूळ यांनी करत न्यायहक्कासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी एकजूट भक्कम करुन आंदोलनात सक्रिय व्हावे, असे आवाहन केले.

बीएसएनएल कर्मचारी अधिकारी संघटनांच्या संयुक्त मंचाच्या वतीने येथील संचार भवनात आयोजित जिल्हा सचिवांच्या राज्यव्यापी संमेलनात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मंचाचे राज्य अध्यक्ष रंजन दाणी हे होते. मुख्य संयोजक कौतिक बस्ते, संघटनेचे नेते पंडित वानखेडे, तेजस तडसरे, दिनेश वळवी आदी उपस्थित होते.

अडसूळ म्हणाले की, कंपनी नफ्यासाठी काम करत नसून देशसेवेसाठी कार्यरत आहे. जिथे दहा घरांची वस्ती असते अशा ठिकाणी सुद्धा बीएसएनएलने टॉवर उभे केले आहेत. व्हीआरएस २०२० मुळे मोठी कर्मचारी कपात झाली, सगळी कामे कंत्राटदारांकडे सोपवण्यात आली. त्यातून हजारो लँडलाइन कनेक्शन बंद झाले. स्पेक्ट्रम चार्जेस, अतिरिक्त पेंशन योगदान, जमिनी आणि डेटा सेंटरवर लावले जाणारे अतिरिक्त कर, जीएसटीतून दीड लाख कोटी रुपये सरकारने बीएसएनएलकडून वसूल केले आहेत. कर्मचारी अधिकारी यांची कमतरता आणि घाऊक कंत्राटीकरणामुळे बीएसएनएल आज अडचणीत असल्याचा दावा त्यांनी केला. बीएसएनएल कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम करून एकूण उत्पन्न १८ हजार कोटींवरून २३ हजार कोटीपर्यंत वाढवले आहे ही नक्कीच उल्लेखनीय कामगिरी आहे. बीएसएनएलच्या या सामाजिक आणि राष्ट्रीय योगदानाची दखल घेऊन कर्मचाऱ्यांना त्यांचा हक्काचा वेतन करार लागू केला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

हा वेतन करार मिळवण्यासाठी जे देशव्यापी आंदोलन सुरू आहे त्यात प्रत्येकाने सहभागी होऊन आपल्या न्याय्य हक्कांसाठी आवाज बुलंद करावा असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी नागेश नलावडे, जॉन वर्गीस, संदीप गुलुंजकर, दीपक जाधव, अस्लम पटेल, शैलेंद्र सोळूंके, नितीन मोलक, शशी साळवे, शिवाजी चव्हाण, आर. एस. राख, आर. जे. पाटील, रमेश दुबिले, हरीश साबळे, रामू सुरासे, शांतीलाल गायकवाड, भानसिंग पोहाल, अविनाश पुंडकर, बी. आर. गणकवार, विलास सवडे, दत्ता बुबिले आदी उपस्थित होते.



बीएसएनएल कर्मचारी अधिकारी संघटनांच्या संयुक्त मंचाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलताना एसएनइए संघटनेचे महासचिव महादेव अडसूळ, व्यासपीठावर डावीकडून पंडित वानखेडे मुख्य कन्व्हेनर कौतिक बस्ते, अध्यक्ष रंजन दाणी, लिनेश वळवी, तेजस तडसरे आदी.